पर्णवी ब्रह्मकुळे रावळ
सीमा राहुल कवडे



# वेलीसारखी होती ती

# वेलीसारखी होती ती

लेखिका - पर्णवी ब्रह्मकुळे - रावळ

कवियत्री - सीमा राहुल कवडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# वेलीसारखी होती ती

लेखिका - पर्णवी ब्रह्मकुळे - रावळ
फोन - ९७६६०००३५१
email - parnavi.raval@gmail.coom

कवियत्री - सीमा राहुल कवडे
फोन - 9923875497
email - seema.kawade7@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २ डिसेंबर २०१४

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पण पत्रिका

माझे हे दुसरे पुस्तक मी माझ्या आयुष्यात मोहोर बनून येणाऱ्या

सर्व मैत्रिणींना अर्पण करते.

खरच तुम्हा सगळ्यांना खूप खूप Thank you .

आज तुमच्यामुळे माझे आयुष्य आनंदी, उल्हसित होऊ शकले.

प्रत्येकाला त्याच्या आयुष्यात चांगले संस्कार द्यायला

घरातील मंडळी तर असतातच

पण योग्यवेळी चांगले मित्र भेटणे हेही तितकेच महत्वाचे असतात.

योग्य संगतीमुळे आपले आयुष्य पूर्ण बदलू शकते आणि योग्य मार्गावर चालू लागते.

---पर्णवी रावळ

# वेलीसारखी होती ती

# बालपण

अगदी पोर्णिमेच्या चंद्राला शोभेल अशी वृंदा. तशीच निर्मळ, साधी, सरळ. कुणाच्याही अंगणात शोभून दिसेल अशी. मूळचे पुण्याचे असणाऱ्या श्रीमंत बागायतदारांची ही द्वितीय कन्या. दुसरी म्हणण्यापेक्षा एक लहान भाऊ असल्यामुळे मधली. मधलं मूल हे नेहमी मधल्या मधेच असत. त्या मुलाला धड मोठयाचा मानही मिळत नाही आणि लहाण्यासारखे त्याचे लाडही होत नाहीत.

वृंदा स्वभावाने शांत, अगदी मोजक्याच 2-3 मैत्रिणी असलेली, कुणाच्या अध्यात मध्यात नसलेली. अहो पण वृंदा जरी शांत असली तरी घरात बाकीचे लोक होते ना तिला

त्रास द्यायला. घरात लहाण्यापासून मोठ्यापर्यंत सगळेच तिला येता जाता त्रास देणार, तिची चेष्टा करणार, आणि मग वृंदा रागवणार, रडणार. सगळं करून झालं की वृंदा शेवटी शांत राहणार.

तिच्या मोठ्या बहिणीपेक्षा तशी वृंदा दिसायला सुंदर होती. त्यामुळे की काय वृंदाच्या लहानपणापासूनच सर्व नातेवाईकांमधे चर्चा होती की बहुतेक मोठीच्या आधी लहाणीचं लग्न होणार की काय? पण वृंदाच्या मनात मात्र नेहमी बहीणीच्याच लग्नाचा विचार असायचा. असो.  अभ्यासात तशा दोघीही हुशार. किंबहुना मोठी जरा जास्तच होती.

संपूर्ण घरात वृंदाला समजून घेणारी व्यक्ती म्हणजे तिचे लाडके आजोबा. वृंदासोबत ते आम्हा सर्वच मैत्रिणींचे लाड करत असत. आम्हालाही ते खूप आवडत. विशेष म्हणजे वृंदा जितकी आजोबांच्या जवळ होती तितकीच आजी पासून दूर. वृंदाचा आणि आजीचा अगदी 36 चा आकडा. दोघींनाही एकमेकींची एकही गोष्ट आवडत नसे. सकाळी उठल्यापासूनच दोघींची तू तू मै मै चालू होत असे.

आजी (सकाळी उठल्या उठल्या): वृंदा मला चहा दे.

वृंदा : आताच केला मी सगळ्यांना; तेव्हा का नाही मागितलास?

आजी: मला एकटीलाच करुन दे. सगळ्यांसोबतचा चहा मला आवडत नाही.

वृंदा : सारखा चहा करायला मला जमणार नाही ग. त्यामुळे माझा अभ्यास राहतो आणि गॅसही वाया जातो ना.

आजी: मोठी आली अभ्यास करणारी. मला चहा करुन दिलास ना तर परीक्षेत चांगले मार्क मिळतील. नाहीतर होशील नापास.

वृंदा (हे ऐकून तिचा पारा चढायचा) : आता तर मी नाहीच देणार तुला चहा. शिवाय परीक्षेत चांगल्या मार्कनी पास पण होऊन दाखवेल.

असं बोलून झालं की रडत रडत ती तिथून निघून जाई. आजोबांच्या कुशीत जाऊन त्यांना सगळं सांगत बसे. मग आजोबा तिची समजूत काढत. घरात बाकी सगळ्यांना मात्र हिचीच बाजू चुकीची वाटे.

वृंदाची एक खास मैत्रीण होती. अगदी लंगोटी यार, तीच नाव मोहिनी. या दोघींचं खूप छान जमायच. मोहिनी तशी जरा आगाऊ, वृंदाच्या अगदी विरुद्ध स्वभाव असणारी

होती. त्यामुळे की काय घरात काही लोकांना यांची मैत्री आवडत नसे. त्यांना वाटायचं की आपली साधी भोळी मुलगी हिच्यामुळे बिघडेल.

एकदा अशीच वृंदा आणि मोहिनी गप्पा मारत बसल्या होत्या. इतक्यात आजी आणि वृंदाची बहीण तिथे आल्या. काहीतरी टोमणे मारले आणि तिथून निघून गेल्या. मोहिनीला कळलं की आपली मैत्री यांना आवडत नाही. मोहिनीने वृंदाला विचारल -

मोहिनी : आपण नको का गं भेटायला? आपली मैत्री नाही आवडत बहुतेक सगळ्यांना.

वृंदा: असं काही नाही गं. मला तू आवडतेस. तू माझी खूप छान मैत्रीण आहेस. आपल्या नात्यापेक्षा दुसरं मला काहीच मोठं वाटत नाही. यानंतर तू पुन्हा हा विचार करू नकोस.

दोघी नेहमी फिरायला, शॉपिंगला जात. एकत्र अभ्यास करत. स्वभावाला शांत असणारी वृंदा आजीसोबत भांडायला मात्र कुठून जोर आणत असे देव जाणे.

# कॉलेज

बालपण फुलपाखरासारखं उडून गेलं. दहावीची परीक्षा झाली. परीक्षेत 80 % मिळाल्यामुळे वृंदा science ला प्रवेश घेणार हे नक्की झालं. कॉलेजमधे तिला आणखी एक छान मैत्रीण भेटली ती म्हणजे मी. वृंदा शांत आणि मी बोलकी त्यामुळे अर्थातच मैत्रीची सुरवात मीच केली.

तिचा शांत, समाधानी स्वभाव मला आवडायचा. आम्ही पुढे मागे असं बेंच वर बसायचो. आम्ही नेहमी वृंदाच्या शेतात जाउन भातुकली करायचो, बागडायचो, सायकल वरुन बिंधास्त फिरायचो.

छान हसत खेळत दिवस सरून जायचे. एक दिवस आम्ही दोघी वृंदाच्या शेतात गप्पा मारत बसलो होतो. गप्पा मारताना आमच्या लग्नाबद्दलच्या भविष्यातल्या गप्पा चालु झाल्या. गप्पा मारता मारता अचानक वृंदा रडू लागली. मला काहीच समजेना. माझी रोज हसत राहणारी मैत्रीण आज अशी काय रडते?

मी : काय ग काय झालं? लग्नाची भीती वगैरे वाटते का?

वृंदा : नाही गं. आधीच घरात ताई च्या लग्नाचं tension. त्यात आणि माझी भर. माझं लग्नच होतंय की नाही ही काळजी.

मी (हसून) : अगं वेडे, तुझं लग्न का नाही होणार? तू इतकी छान मुलगी आहेस. तितकाच छान मुलगा देवाने बनवून ठेवलाच असेल ना? उगाच कशाला रडत बसतेस.

त्यानंतर वृंदाने तिचा पाय सॉक्स काढून मला दाखवला. त्यानंतर मी जे पाहिले ते हादरवून टाकणारे होते.

मी : वृंदा हे काय? तुला हे डाग कधीपासून आहेत? तुला कोड कसे काय झाले?

वृंदा : हो, मला कोड आहे. सध्या फक्त दोन पाय, मान, ओठांच्या आतमधे डाग आहेत. पण असे म्हणतात की लग्न झाल्यावर ते वाढतात. त्यामुळे मला लग्नच करायचं नाही. आजी नेहमी बाबांना म्हणते की वृंदाला जास्त शिकवत बसू नको. आधीच कोड असलेला

मुलगा शोधणं अवघड आहे आणि त्यातून ती जर शिकलेली असली तर आणखीच अवघड काम होऊन बसेल.

मी: अग़ं, तुझी आजी असं कसं बोलू शकते? तुझ्या भविष्यात काय असेल हे तिला कसं माहीत? कदाचित योग्य औषधं घेतल्याने तुझा आजार बराही होणार असेल. किंवा असेही होऊ शकते की तुला चांगला शिकलेला पण कोड असलेला मुलगा मिळेल. आणि देवाच्या कृपेने शिकलेला पण कोड नसलेला मुलगा मिळाला तर सोन्याहून पिवळं.

वृंदा : औषध तर मी घेतेच गं. खूप लांब जाऊन एका गावावरून आणावे लागते. मग तिकडे जाण्यासाठी माझी कॉलेजला सुट्टी पडते. ते औषध खाण्यासाठी मला सकाळी 4 वाजता उठावं लागत. काढा बनवावा लागतो. ते औषध इतके उष्ण असतं की मला दुसरेच त्रास चालू झाले आहेत. त्यामुळे अभ्यासात ही मन लागत नाही. (वृंदा रडू लागली)

मी: रडू नकोस ग. मला सांग कधीपासून आहे हा त्रास तुला?

वृंदा : 8वी मधे असताना अचानक एक दिवस हा डाग दिसला. मला वाटलं काहीतरी चावलं असेल. पण नंतर आई बाबा काळजीत दिसल्यावर लक्षात आलं की हे काहीतरी भयानक आहे. त्यानंतर वेगवेगळया डॉक्टरकडे जाणे चालू झाले.

मी: इतके दिवस झाले आपल्या मैत्रीला, पण तू मला कधीच काही बोलली का नाही?

वृंदा: मला भीती वाटते ग कुणालाही हे सांगण्याची. त्यामुळे जर माझी मैत्रीण माझ्यापासून दूरावली तर? कारण असे आधी झाले आहे. माझा आजार समजल्यावर लोक माझ्यापासून दूर झाले. तुझ्यावर आज तो विश्वास वाटला म्हणून तुला संगितलं. आणि तसंही मला आपली दुःख कुरवाळत बसायला नाही आवडत.

त्यानंतर आम्ही आपापल्या घरी गेलो. मी रात्रभर तिचाच विचार करत होते. खरंच मुलीला कोड असेल तर आई वडिलांना इतक tension असतं का ? आणि प्रश्न जर कोड असण्याचा आहे तर मुलाला जर कोड असेल तर त्याच्याही घरी इतकं tension असतं?

एक कोड असलेला मुलगा जर साधारण मुलीशी लग्न करू शकत असेल तर एक कोड असणाऱ्या मुलीला का भीती वाटावी की आपल्याला चांगला मुलगा नाही मिळणार?

आमची दिनचर्या पुन्हा चालू झाली. मला वृंदाचं फार कौतुक वाटे. छान अभ्यास करणं, औषध घेणं, आजोबांशी गप्पा मारणं, फिरायला जाणं, बागडणं चालू होतं.

झालं. आमची बारावी झाली.

# सिनिअर कॉलेज



आता मात्र आमचे रस्ते वेगळे होते. कारण आमची कॉलेजं एकमेकींपासून लांब होती. तिने फ़ार्मसी घेतलं. हो पण म्हणून आमची मैत्री नाही तुटली. पंधरा दिवसातून एकदा तरी आम्ही भेटायचो. कधी कधी एकमेकींकडे राहायला जायचो. याच दरम्यान वृंदाच्या बहिणीचे लग्न ठरले.

ताईच्या लग्नासाठी वृंदा अगदी नक्षत्राप्रमाणे सजली सवरली

होती. नेहमी भांडणाऱ्या बहिणीसाठी वृंदा अगदी मनापासून कामाला जुंपली. खूप काम करूनही तिच्या चेहऱ्यावर थकवा नव्हता. समाधान होतं. ताई सासरी गेल्यावर मला पूर्ण एक रात्र आणि एक दिवस वृंदाला समजावण्यात गेले. ताई पण आम्हा सगळया मैत्रिणींना सांगून गेली कि वृंदा ला सांभाळ. तिला कधी एकटं पडू देऊ नका.

ताईच्या लग्नात सजलेल्या वृंदाला पाहून मला पौर्णिमेचा चंद्र आठवला. जो सुंदर तर असतो पण त्याला नजर नको लागायला म्हणून कि काय त्याच्यावर डाग असतात. थोड्याच दिवसात वृंदा नॉर्मल होऊन पुन्हा नव्या जोमाने अभ्यासाला लागली. छान मार्क मिळवून पास झाली. आता आम्ही कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होतो. आमचं एकमेकींना भेटणं, फिरणं चालू होत. आजोबांशी गप्पा मारत बसणंही चालू होत. त्यांचे तरुण वयातले एक एक किस्से ऐकून मज्जा वाटायची. इतक्यात अचानक एक दिवस मला वृंदाचा फोन आला.

वृंदा : (रडून) अग एक वाईट बातमी आहे.

मी: का ग काय झालं?

परीक्षेमुळे एक महिना झाला आमचा एकमेकींशी काही संवादच नव्हता.

वृंदा : पंधरा दिवसांपूर्वी आजोबा देवाघरी गेले.  अचानक त्यांचा श्वास अडकला, रात्रीच्या रात्री गुदमरून ते कुणालाही न सांगता निघून गेले.

मी एकदम shock झाले. त्या दोघांची एकमेकांशी खूप घट्ट मैत्री होती. आता वृंदा घरात एकटीच पडल्यासारखी झाली. तिला रोज सांभाळणारा आता तिच्याकडे नव्हता. तिचं कसं होणार मलाच प्रश्न पडला. मी लगेचच तिच्याकडे गेले. शक्य तितकी तिची समजूत काढली. पण मलाही माहिती होते कि कुणाची कमी आपण कुणीच नाही भरून काढू शकत.

हळूहळू वृंदा त्या धक्यातून सावरली. फार्मसी मध्ये 1st क्लास मिळवून बाहेर पडली. आता ती जॉब करू लागली.



# प्रेमाची चाहूल

याच दरम्यान वृंदाला प्रेमाची चाहूल लागली. तिच्याच घरातला, तिच्या आत्याचा मुलगा होता. एक दिवस तो तिच्या घरी आला होता. तसा तो लहानपणापासूनच त्यांच्या घरी नेहमी यायचा.पण आजचं त्याचं वागण वृंदाला थोडं वेगळं वाटत होतं. ते दोघं वर्षातून २-४ वेळा एकमेकांना भेटत आणि गप्पा मारत. पण आज त्याच्या गप्पाच वेगळया होत्या, त्या नेहमी प्रमाणे नव्हत्या.

तो: तुझी लग्नाबद्दलची काय इच्छा आहे?

ती : काही नाही, एखादा माझ्यासारखाच आजार असणारा मुलगा आई वडील शोधणार आणि मग मी लग्नाला उभी रहाणार.

तो : असं का म्हणतेस? तुला नॉर्मल मुलगा नाही का मिळू शकणार? तू असं ठरवूनच टाकलं आहेस का कि तुला नॉर्मल मुलगा नाही भेटणार.

ती : हो अरे. मी वास्तव स्वीकारलाय. आपला समाज तुला ठाऊक नाही का. इथले नियम वेगळे आहेत.

तो : मी नाही असे समजत. तुझं शिक्षण उत्तम आहे आणि तू दिसतेस इतकी सुंदर. तुझ्या स्वभावाबद्दल तर काही बोलायलाच नको. तुझ्यासारखी चांगली मैत्रीण, अर्धांगिनी मिळणं म्हणजे त्या मुलाचाचं भाग्य म्हणव लागेल. फक्त एक डाग तुझ्यापासून तुझा राजकुमार नाही हिरावून घेऊ शकत.

ती : जावू दे रे. नको मनाला उगाचच खोट्या आशा दाखवायला. मी जाते माझ्या खोलीत झोपायला. तूही झोप.

असे बोलून ती निघून गेली. त्या दिवशी तो त्यांच्याकडेच राहिला. दुसरे दिवशी घरात खूप मौज मज्जा झाली. वृंदाची ताई पण आली होती माहेरपणासाठी. सगळे घरातील लोक मिळून सिनेमा पाहायला गेले. संध्याकाळी पुन्हा वृंदा आणि तो गप्पा मारत बसले.

तो : वृंदा मी २ वर्षांसाठी बाहेर देशी जाणार आहे.

वृंदा : अरे वा. पण काय करणार तू तिकडे जाऊन? नोकरी कि शिक्षण ?

तो : शिक्षण. मी M .S . करणार आहे. U.K. ला जाऊन. तिकडे जाण्यासाठी परीक्षाही देणार आहे मी यावर्षी. आणि मला खात्री आहे माझं यावर्षी तिकडे जाण्याचं काम होईलच.

वृंदा : छान आहे कि रे. जा तू. चांगलं करिअर होईल तुझं.

तो : पण मी तिकडे जाऊन तुला खूप मिस करेल.

वृंदा : (थोड गोंधळून) फक्त मला कि सगळयांना ?

तो : सगळयांपेक्षा जास्त तुला.

वृंदा शांत राहून तिथून निघून जाण्याचा प्रयत्न करत होती, कदाचित तिला प्रेमाची चाहूल लागत होती. तेवढ्यात त्याने तिला थांबवून घेतलं आणि तो बोलू लागला.

तो : वृंदा तू माझ्यापेक्षा वयाने १ वर्ष मोठी आहेस. तुला कोड आहेत हे हि मला माहित आहे. पण एक सांगतो. मला गेल्या २ वर्षांपासून तू आवडतेस. मी मनापासून तुझ्यावर प्रेम करतो. एकदा का U.K. वरून शिक्षण घेवून आलो कि चांगली नोकरी बघून मी तुझ्याशी लग्न करण्याचा विचार करतोय. देशील का मला साथ ?

वृंदा : मला जरा विचार करू देत. मलाही तू आवडतोस. पण मला खूप गोष्टींची बंधन आहेत. मी तुला उद्या सांगेल.

दुसरा दिवस उजाडला. रात्रभर वृंदा झोपलीच नव्हती. घरातले आई वडील आत्याचे संबंध, आपलं त्याच्यापेक्षा मोठं असणं, आपल्याला कोड असणं, हे सगळं तिच्या डोक्यात गोंधळ घालत होतं. पहाटे पहाटे तिने हे सगळे विचार दूर सारून फक्त स्वतःचा विचार केला. खरंच आपल्याला हा मुलगा नवरा म्हणून आवडेल का? तिच्या मनाने

होकाराचा कौल दिला. त्याचं कारण म्हणजे आपले स्वभाव बऱ्यापैकी जुळतात, एकमेकांना आपण छान ओळखतो, त्याचं आपल्यावर मनापासून प्रेम आहे. तेही आपले सगळे negative point माहित असताना. मग अजून काय हवे आहे ?

तो स्वतःहून विचारतोय या गोष्टीचा आपण आदर करावा. एका मुलीला आपल्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या नवरा सोडून काय हवे असते लग्नानंतर. अखेर हा सगळा विचार करून वृंदा ने त्याला होकार दिला.

त्यावेळी त्याचा आनंद वर्णन करण्यापलीकडचा होता. अक्षरशः वृंदाला कुठे ठेऊ आणि कुठे नको असे झाले होते त्याला. तीही खूप आनंदी होती. पण तिने होकार कळवून लगेचच त्याला काही प्रश्न विचारले.

वृंदा : तू आई वडिलांना कसे समजावणार ?

तो : तू काही काळजी करू नकोस. करतो मी सगळे व्यवस्थित. फक्त मला एकदा शिक्षण पूर्ण करून जाऊन येऊ दे.

वृंदा : ठीक आहे. मी थांबेल तुझ्यासाठी. तू पुढे जा खूप मोठ्ठा हो. तुझे स्वप्न पूर्ण झाले कि मग माझी जबाबदारी घे.

तो : हो अगं. माझ्याही मनात तेच होत. मला फक्त तुझ्या प्रेमाची साथ दे.

सगळं बोलणं झाल्यावर तो U.K. ला गेला. ते दोघं नेहमी नेट वर chatting करत. साधारण २ वर्षे पूर्ण झाल्यावर तो परतला.

पण देवाने त्यांच्या नशिबात काहीतरी वेगळेच लिहिले होते. तो भारतात आला आणि त्याचे वडील किडनीच्या आजाराने पिडीत झाले. वृंदाने शक्य तितकी सर्व मदत त्याला पुरवली. वडिलांच्या सेवेत मग्न राहिल्यामुळे त्याला नोकरीही मिळवायला जमलं नाही. अखेर त्याच्या वडिलांचा आजार इतका वाढला कि ते सर्वांना सोडून निघून गेले.

हे सर्व घडेपर्यंत ३ - ४ वर्षांचा कालावधी वृंदाच्या आयुष्यातून निघून गेला. सगळं नॉर्मल झालं. त्याला नोकरीही लागली. सगळं ठीक झाल्यावर वृंदाने त्याला लग्नाबद्दल विचारलं. कारण आता तिच्याही घरी तिच्या लग्नाचं tension वाढत होतं. तिला उत्तर देताना त्याने आई आणि भावाशी बोलून कळवतो असे सांगितले.  चार दिवसांनी त्याचा वृंदाला फोन आला.

तो : sorry वृंदा, पण या बदललेल्या परिस्थितीत मी आईला नाही दुखवू शकत. तिची इच्छा नाहीये तू तिची सून व्हावी अशी. आणि आता तिला मी एकटी सोडू शकत नाही. प्लीज समजून घे. Sorry.

वृंदाच्या पायाखालची जमीनच निघून गेल्यासारखे तिला झाले. पण तिनेही त्याची मनस्थिती समजावून घेतली. स्वतःसोबत त्यालाही सावरल. त्याला आई नाही म्हणण्याचं खरं कारण विचारलं. पण तो इतकंच म्हणाला कि मी तुला सांगू शकत नाही. मी माझ्या

कडून fail झालो घरच्यांची समजूत काढण्यात. मी तुला दिलेले वचन खोटे होते असे समजून मला विसरून जा.

बस इतकच बोलून त्याने ४ वर्षांचे संबंध एका क्षणात तोडून दिले. आणि विशेष म्हणजे या ४ वर्षांच्या त्या दोघांच्या नात्याचा शेवट त्याने एकट्याने केला. स्वतःच्या मर्जीप्रमाणे. त्याच्या या वागण्यावरून सिद्ध झालं कि हे नात फक्त त्याचं होत. त्यामध्ये समोरच्या मुलीला, तिच्या भावनांना काहीच महत्त्व नव्हते. साध तिचं मतही त्याला विचारावंसं वाटलं नाही. त्यानंतरही वृंदा ने त्याला खूप वेळा विचारलं कि तू मला खरं कारण सांग. तू माझ्या कोडांमुळे मला नाही म्हणतोय ना ? त्याने त्या प्रश्नावर केवळ मी तुला काहीही सांगू शकत नाही इतकंच उत्तर दिलं. त्यानंतर त्याने वृन्दाशी संपूर्ण संबंध तोडून टाकले. आणि तो त्याच्या विश्वात रममाण झाला.

काय दोष होता त्या निरागस मुलीचा? नक्की कुठे चुकली होती ती? माणूस ओळखण्यात ? प्रेम करण्यात? समोरच्या माणसावर पूर्ण विश्वास ठेवण्यात? त्याच्या प्रत्येक अडचणी आपल्या समजून त्यांना सामोरे जाण्यात ? या सर्व प्रश्नांची उत्तर तिथेच ठेऊन तिने पुढचा प्रवास सुरु केला.

तो तुझाच डाव होता

खोट्या अश्रूंचा आव होता

डोळ्यांआड वेगळे होते

शब्दात मात्र निभाव होता

उगाच भुलले मी त्यांना

स्पर्शही त्यांचा घाव होता

म्हणूनच संपले मी कदाचित

प्रेमाच्या लपंडावात तो तुझा अखेरचा डाव होता.

# पुढचं शिक्षण

काही दिवसांनी तिचा M.Pharm ला पुढ्च्या शिक्षणासाठी नंबर लागला. वृंदाच्या वडिलांनी तिला कधीच शिक्षणासाठी अडवलं नाही. तिनेही अगदी जोमाने अभ्यासाला सुरवात केली. M . Pharm ला 1st क्लास डिगरी तर तिने मिळवलीच पण त्यासोबत नवीन मित्रमैत्रीणीही जमवले. जुन्या मैत्रीणीही तिने तशाच जपून ठेवल्या. असेच एक दिवस तिला मोहिनी चा फोन आला. तिने एका मुलाला पसंत केलं होत. आणि आता तिच्या घरच्यांचा त्यांच्या लग्नाला विरोध होता. मोहिनीला वृंदाच्या मदतीची गरज होती. वृंदाने हरप्रकारे मोहिनीच्या घरच्यांना समजावले. पण त्यांनी नाहीच ऐकलं. मुलगी हाताबाहेर जायला नको म्हणून त्यांनी एक मुलगा बघून तीचं त्याच्याशी लग्नही लावायचं ठरवलं.

मोहिनीचं प्रेम, तिची तडफड पाहून वृंदाचा जीव कासावीस होत असे. ज्या मुलावर मोहिनीचं प्रेम होत तो तर तिची समोरून जबाबदारी घ्यायला आणि तिला आयुष्यभर

सांभाळायला तयार होताच. त्या दोघांची एकमेकांसाठी ओढ बघून वृंदाने त्यांना मदत करायचं ठरवलं. वृंदाने मोहिनीला घरातून बाहेर काढण्यापासून मदत केली. आणि एकमेकांसाठी झुरणाऱ्या दोन जीवांना एकत्र केल. एका मुलीच्या आयुष्यात तिच्यावर प्रेम करणारा आणि त्याहीपेक्षा केललं प्रेम निभावणारा मुलगा मिळणं किती आवश्यक असतं हे वृंदापेक्षा चांगलं कुणाला समजू शकतं? असो. आजही ते दोघं वृंदाचे नेहमी नाव काढतात. तिचे आभार मानतात. पण वृंदाने मात्र स्वतःच्या आणि मोहिनीच्या घरून त्यावेळी खूप ओरडा खाल्ला.

सारं काही विसरून वृंदाने नवीन प्रवास सुरु केला. तिची नोकरीही चालूच होती. तिला स्थळही खूप येत होते. तिला कुणीतरी एखाद्या लग्नात वगैरे पाहत असे. आणि लगेचच घरी फोन करत असे. तिची प्रसन्न, शांत, समाधानी मुद्रा कुणालाही पसंत पडे. त्याचवेळी काही मुलं तिला पाहायलाही आली. विशेष म्हणजे masterate झालेल्या मुलीला पहायला ITI झालेली मुलंही येत असत. पण जेव्हा त्यांना समजे कि मुलीला कोड आहेत तेव्हा ते नकार कळवत. वृंदाला असं वाटे कि सगळयांना पूर्व कल्पना देवूनच आपण बोलवायचं.

दिवसेंदिवस वृंदाचं एकटेपण वाढत होत. आम्ही मैत्रिणी तर होतोच पण तरीही तिची मनस्थिती स्थिर नव्हती हे आम्हाला जाणवत होत. बऱ्याचदा ती काही बोलत नसे. पण आम्हाला ते जाणवत असे.

वेलीसारखी होती ती

अगदी तुझ्या माझ्यासारखी

तरीही स्वतःसाठी परकी

डोळ्यात तिच्या निरागसता

कोणीही टिपेल एकटेपणाची ती अवस्था

रडते ती कधीही हसता हसता

कोण शोधेल तिच्या मनाचा रस्ता

उमलत्या कळीला भुंग्याची आस

तिच्या मनाला कुणाचा ध्यास

हवा होता तिला कुणीतरी

हळूच जाईल जो मनाच्या विहिरी

अलगद उचलेल भावना लहरी

याचदरम्यान वृंदाला एक नवीन मित्र भेटला. तिच्या लेखी तो फक्त एक मित्रच होता. पण कोण जाणे त्याच्या मनात काय चालू होत.

वृंदाच्या घरी सगळे स्थळ शोधत होते आणि ती मात्र अडून बसली होती कि पूर्वकल्पना देऊनच मुलाला मला पाहायला बोलवा. कारण हे आता नेहमीचं झालं होत कि मुलगा येत असे आणि पसंत आहे असेही सांगत असे. पण जेव्हा त्याला कळे कि मुलीला कोड आहेत तेव्हा नकार कळवत असे.

या सगळया प्रकाराला वृंदा जाम कंटाळली होती. तिने हा जो काही निर्णय घेतला होता, त्याचा परिणाम मात्र वेगळाच होत होता. आधी तिला पाहायला स्थळ येत तरी होती पण आता तीही बंद झाली. तिचे घरचे आणि आम्ही मैत्रिणी तिला समजावत होतो पण ती मात्र ऐकत नव्हती. अखेरीस एक दिवस तिच्या आई वडिलांना यश आले. वृंदा मुलाला कोडाबद्दल न कळवता पाहायला तयार झाली खरी पण थोडी नाराज होऊनच. जेव्हा तिने हि सगळी चर्चा माझ्याशी केली तेव्हा मीही गोंधळले. काय बरोबर काय चूक मला काहीच कळेना. मुलाला आधी सांगणं बरोबर कि न सांगणं? धर्मसंकटात टाकणारा प्रश्न मला वाटला. वृंदाचा प्रामाणिकपणा समजून घेऊन कुणी तिला योग्य समजेल का? पण कुणी का घेईल? तो एक तिऱ्हाईत व्यक्ती त्याला काय घेणं देणं तिच्याशी? विशेषता जो मुलगा कमी शिकलेला कोड नसलेला असेल तो असेही म्हणू शकतो कि मला थोडी कमी शिकलेली, दिसायला बरी असलेली मुलगी चालेल पण ती नॉर्मल असावी.

आता ह्याच गोष्टीच्या विरुद्ध विचार केला तर असे वाटते कि जर एखादा मुलगा हिला भेटला त्याने हिला पाहिलं आणि जर त्याला हिचा खरा स्वभाव कळला तर त्याला ही आवडूही शकते. कदाचित मुलगी आवडल्यावर त्याला बाकीच्या गोष्टी गौण वाटतील. शेवटी मीही तिला तुझ्या आईवडीलांचं म्हणणं बरोबर आहे असे सांगितले.

या काळात जो तिचा नवीन मित्र झाला होता, त्याने तिला लग्नाची मागणी घातली. तिच्या ध्यानी मनी नसताना अचानकच पुन्हा एकदा तिला धक्का बसला. खरं म्हणजे वृंदाच्या मनात असे काहीच नव्हते त्याच्याबद्दल. तिच्या लेखी तो फक्त तिचा खरा मित्रच होता.

वृंदाने त्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. तिने त्याला समजावले कि माझ्या मनात तुझ्याबद्दल अशा काहीच भावना नाहीत. तू खूप चांगला मुलगा आहेस पण मला तू मित्र म्हणूनच आवडतोस. तो मात्र समजून न घेत हट्टच धरून बसला कि तू मला हो म्हण. वृंदा पूर्णपणे द्विधा अवस्थेत गेली.

सध्या ऑफिस मध्ये खूप महत्वाचे काम चालू असल्याने तिने तो विषय बाजूलाच राहू दिला. अर्थात मनात कुठेतरी शंकाही होती कि हा पण असाच असेल. लग्नाची वेळ आली कि मागे फिरणारा. आणि मुळात जर तो आपल्याला नवरा म्हणून आवडतच नसेल तर आपण का त्याला हो म्हणाव ?

फक्त त्याच्या हट्टासाठी ?

तुझी मजला प्रीत कळली,
पण मैत्रीची माळ मी ओवली,
घे घालुनी माझी माळ
घेऊ नको पण प्रेमाला आळ,
सुरात सूर जुळतात जेव्हा
बासरीत स्वर होतात तेव्हा,
स्वरांना माझ्या दे तू साथ
पण मागू नको प्रेमाचा हात,
पाण्यासारखी खळखळ वाहू दे
तुझी नी माझी वाट सख्या रे
उगाचच नको देऊ
प्रीतीची गढूळ आडवाट तिला रे.

इकडे घरी नील नावाचा मुलगाही तिला पाहायला आला. डिप्लोमा engineer होता. स्वभावही चांगला वाटला. त्याला पाहता क्षणीच वृंदाला तो आवडला. त्याचीही मुद्रा हिच्याप्रमाणेच प्रसन्न होती. पण त्यालाही अजून माहितीच नव्हते कि हिला कोड आहे. वृंदाच्या घरून तिला बघून निघताना नील चा चेहरा होकार दर्शवत होता. तिने ते गवसलं होतं. पण वृंदाचा चेहरा मात्र गोंधळलेला होता. दुसऱ्याच दिवशी त्यांच्याकडून होकाराचा फोन आला. नीलच्या आजोबांनी फोन केला होता. वृंदाच्या वडिलांनी त्यांना कोडाबद्दल माहिती दिली. त्यांनी काहीच हरकत नाही असे कळवले.

त्याच्याच दुसऱ्या दिवशी मी औरंगाबादला गेले. वृंदाने मला सर्व हकीकत सांगितली. नील तिला आवडलेत हे हि तिने मला सांगितले. त्यांचा हसरा चेहरा आत्मविश्वासाने बोलणे, आदबीने वागणं सगळंच तिला भावलं होतं. पण मनात कुठेतरी शंकेची पाल चुकचुकत होती. इतक्या पटकन तिकडून होकार कसा आला? मुलगा नॉर्मल, कोणतीही शारीरिक कमतरता नसूनही तो लग्नाला कसा काय तयार झाला? नील नोकरीनिमित्त औरंगाबादला राहत होता. मी तिथेच असल्यामुळे मला त्यांना भेटून खात्री करून घ्यायची इच्छा झाली. मी वृंदाकडून त्यांचा नंबर घेतला आणि त्यांना भेटायला त्यांच्या ऑफिसमध्ये गेले.

मी: तुम्हाला वृंदा खरंच मनापासून आवडली?

नील: हो खरंच आवडली आहे

मी: पण का?

नील: तिची शांत मुद्रा समाधानी स्वभाव त्यावरचे एकाकीपणाचे भाव मला कुठेतरी मनाला स्पर्श करून गेले. विशेषतः तिचे लोभस हसणे मला जास्त आवडलं. तिला बघून विश्वास वाटला कि हे मुलगी आपला संसार आवडीने आणि विशेषतः समाधानाने करेन. आणि मला हवी तशी जवळची एक हक्काची माझी मैत्रीण मला भेटेल.

मी: खूप छान ओळखलत हो तुम्ही माझ्या मैत्रिणीला. ती अगदी तशीच आहे. पण तुमच्या घरच्यांना ह्या सगळ्याची कल्पना आणि मान्यता असेल का?

नील: त्यांनी निर्णय माझ्यावर सोपवलाय. काहीजण विरोधातहि जातील. पण मी माझ्या आयुष्याचा निर्णय स्वतःच घेणार. मुख्य मणजे मला तिच्यातील आत्मविश्वास परत आणायचा आहे. तिच्या आयुष्यात एक नवचैतन्य आणायचे आहे.

मी: खरंच हे तुम्ही कराल न? मी तिला हताश होताना नाही बघू शकणार. पण कदाचित असं तर नाही न होणार कि लग्नानंतर तिचा आजार वाढला तर मग तुम्हाला तिला बाहेर चारचौघात घेऊन जाताना लाज वाटेल.

नील : मी लग्न स्वतःसाठी करतोय, समाजासाठी नाही. माझ्या मनात कधीच माझ्या बायकोबद्दल लाज वाटेल असे होणार नाही.

मी : ठीक आहे. तुम्ही घेतलेल्या निर्णयावर ठाम राहणार असाल तर छानच होईल.

हा सगळा वृतांत मी वृंदाला सांगितला. तिच्या मनाला हे सगळ भावून गेल.

त्यानंतर नीलला त्याच्या नातेवाईकांकडून बराच विरोध झाला. पण तो मात्र स्वतःच्या मतांवर ठाम होता. वृंदाला फोन करून तो आनंदी ठेवण्याचा आणि समजावण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता.

इकडे वृंदाने आपल्या मित्रालाही समजून सांगितले. तिच्या मनातली नील साठी असणारी जागा तिने त्याला जाणवून दिली. त्यानेही वृंदाच्या आनंदी राहण्यात स्वतःचं समाधान मानलं आणि तो तिच्या मार्गातून बाजूला झाला.

खरच मनापासून प्रेम असेल तर माणूस नातेवाईक काय पण पूर्ण जग जिंकू शकतो, हे नीलला पाहून समजल. प्रेमाची शक्ती त्याने दाखवून दिली आणि त्याच सोबत स्त्री बद्दलचा आदरही. आज ३ वर्षे झाली पण दोघंही सुखाने संसार करतायेत. येणाऱ्या प्रत्येक संकटाला दोघं मिळून सामोरे जातायेत.

कित्येकदा असे प्रसंग येतात कि, सासरच्या काही लोकांच्या नजरा किंवा बोलणे वृंदाला झेलावे लागते. पण प्रत्येक वेळी ते वृन्दाकडे येण्याच्या आधीच त्याला नील सामोरा गेलेला असतो. वृंदाला पायाच्या नखापासून डोक्याच्या केसापर्यंत लोक न्याहाळत असतात, पण त्यांची ती नजर वृंदाच्या आधी नीलने टिपलेली असते. इतकच नाही तर त्याला सडेतोड उत्तरहि दिलेलं असत. देवाने कन्यारत्न त्यांच्या पदरी दिलंय. तीचं संगोपन ते दोघं मिळून अगदी चांगल्या संस्कारांमध्ये करतायेत.

नीलला आपली निवड न चुकल्याचा अभिमान आहे. वृंदा त्याच संपूर्ण घर, नातेवाईक व्यवस्थित सांभाळते. तिच्या रूपाने लक्ष्मीच जणू त्यांच्या घरात आलीये असे सर्वांना जाणवते.

खरंच माणसाचं अंतर्मन ओळखून त्याच्यावर प्रेम केलंत तर आयुष्यात कशाचीच कमतरता राहत नाही. आजही वृंदाच्या ओठी एकच सूर असतात.

तुझ्या येण्याने ओल्या हळदीचा रंग खुलला

तुझ्या प्रेमाने माझ्या दुनियेचा रंग बदलला

क्षितिजाकडे बघते मी जेव्हा

तुझीच सख्या रे होते मी तेव्हा

आकाशातील तारे हि माझे

श्रावणातील हसरे गाणे हि माझे

समुन्दराच्या लहरींचे स्वरही माझे

आता मन म्हणते हे सगळे जगही माझेच.

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. पण तो केवळ टाईमपास नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातूनही शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. आणि मातृभाषा जर मराठीसारखी भरजरी, वैभवशाली आणि धारदार असेल तर मनावर होणारा परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विनामूल्य मिळवतो. कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी, रुजवावी, जोपासावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर

आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहिही साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

आता आम्हाला वाचकांचं पाठबळ हवंय. ज्यांना पुस्तकं वाचायला आवडतात त्यांचे ई मेल पत्ते पाठवाच. पण जे साक्षर असून, मराठी असून वाचत नाहीत, किंवा 'मराठी' वाचत नाहीत अशांचे मेल पत्ते आवर्जून पाठवा. अशा दहा लोकांपैकी एकाला जरी मराठी वाचनाची आवड लावण्यात आपण यशस्वी झालो तरी ते एक पुढचे पाऊल असणार आहे. म्हणून ही कळकळीची विनंती आहे की आपल्या आजूबाजूच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. या पत्त्यांचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी पुस्तके पाठवण्यासाठी केला जाईल. त्याचबरोबर तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद म्हणून नोंदले जाईल. ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान